# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:21.02.2025** **वार:शुक्रवार**

---

- दिल्लीत होणाऱ्या ९८व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचं आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्घाटन
- २३व्या पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात मराठी विभागात ‘सांगळा’ चित्रपटाची बाजी
- जागतिक अशांततेच्या काळात शाश्वत विकासाची उद्दिष्ट गाठणे आव्हानात्मक असल्याचं केंद्रीय मंत्री पियूष गोयल यांचं प्रतिपादन
- राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या  दहावीच्या परीक्षेला आजपासून सुरुवात
- आणि
- चँपियन्स करंडक क्रिकेट स्पर्धेत भारताची विजयी सलामी; बांग्लादेशवर सहा गडी राखून मात

आता सविस्तर बातम्या

**इंट्रो**

**साहित्यसंमेलन**

अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचं सरहद आयोजित ९८वं अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन आजपासून दिल्लीत सुरू होत आहे. ज्येष्ठ लेखिका डॉक्टर तारा भवाळकर यांच्या अध्यक्षतेखाली होत असलेल्या या संमेलनाचं उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणार आहे. ऐकुया याबाबतचा वृत्तांत

**स्क्रिप्ट**

**दिल्लीतल्या तालकटोरा स्टेडियममध्ये उभारलेल्या छत्रपती शिवाजी महराज साहित्यनगरीत आजपासून तीन दिवस माय मराठीचा जागर होणार आहे. अनेक वर्षांनी दिल्लीत रंगणाऱ्या या संमेलनासाठी राज्य सरकारनं एकंदर चार कोटी रुपये निधी देण्याचा निर्णय घेतला आहे. दरवर्षी साहित्य संमेलनासाठी २ कोटी रुपये दिले जातात. मात्र या संमेलनाचा वाढलेला खर्च, संमेलनाचं वेगळेपण यासारख्या कारणांमुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या संमेलनासाठी अतिरीक्त २ कोटी रुपये द्यायला विशेष बाब म्हणून मंजुरी दिली आहे. या संमेलनाबाबत आमचे प्रतिनिधी मुजम्मील पटेल यांनी अधिक माहिती दिली ..**

**छत्रपती शिवाजीमहाराज साहित्य नगरी इथं हे संमेलन होणार आहे. सुरुवातीला डॉ. बाबासाहेब आंबेसकर सभामंडप इथं ग्रंथ दिंडी आणि ध्वजारोहणाचं आयोजन करण्यात आलं आहे. या संमेलनाचं उद्घाटन आज दुपारी दिल्लीच्या विज्ञान भवन इथं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या शुभ हस्ते होईल. याप्रसंगी स्वागताध्यक्ष शरद पवार प्रमुख पाहुणे आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि संमेलनाध्यक्ष डॉ. तारा भवाळकर उपस्थित असतील. उद्घाटनाच्या दुसऱ्या सत्रामध्ये सायंकाली होणाऱ्या कार्यक्रमात डॉ. तारा भवाळकर यांच अध्यक्षीय भाषण होईल. आजच सायंकाळी निमंत्रीतांचं कवीसंमेलन रंगणार आहे. या संमेलनासाठी मराठी साहित्य रसिक मोठ्या संख्येनं दिल्लीमध्ये दाखल झाले आहेत**

**मराठी भाषेला मिळालेला अभिजात दर्जा वाढवणं आणि टिकवणं, ही मराठी भाषिकांची जबाबदारी असल्याचं प्रतिपादन या संमेलनाच्या नियोजित अध्यक्ष डॉ तारा भवाळकर यांनी केलं आहे....**

**केवळ कुठेतरी सरकारी शिक्कामोर्तब झालं म्हणून भाषेसारख्या गोष्टीचा दर्जा एकदम वाढत नाही. त्यातनं काही आर्थिक फायदे होण्याची शक्यता आहे. शासनाकडून मराठी भाषिकांना, संस्थाना, विद्यापीठांना किंवा नवीन येणाऱ्या साहित्यीकांना, संशोधकांना काही आर्थिक काही आर्थिक साहाय्य होऊ शकेल. त्याने प्रकाशन संस्था निघू शकतील आणि निघाव्यात आणि त्याच्यासाठी मराठी जाणकार भाषिकांनी जास्त प्रयत्न करायला पाहिजे. नुसता दर्जा मिळाला म्हणून स्वस्थ बसून चालणार नाही. तो दर्जा वाढवणं आणि टिकवणं हे माणसांच्या,भाषिकांच्या हातात आहे.**

**दरम्यान या साहित्य संमेलनासाठी पुण्याहून बुधवारी निघालेली महादजी शिंदे विशेष रेल्वे काल रात्री दिल्लीत पोहोचली; दोन दिवसांच्या या प्रवासादरम्यान 'मराठी साहित्ययात्री संमेलन' आयोजित करण्यात आलं होतं. राज्याच्या विविध भागातून आलेले सुमारे बाराशे साहित्यिक, समाज माध्यमातील प्रभावी व्यक्तिमत्व, युवक, लोककलाकार आणि साहित्य रसिकांच्या प्रचंड उत्साहात हे संमेलन पार पडलं. आकाशवाणी बातम्यांसाठी माधवी कुलकर्णी पुणे.**

**विद्रोहीसंमेलन**

१९वं अखिल भारतीय विद्रोही मराठी साहित्य संमेलन आजपासून छत्रपती संभाजीनगर इथल्या आमखास मैदानावर सुरू होत आहे. लोकसाहित्याचे अभ्यासक डॉ. अशोक राणा या संमेलनाच्या अध्यक्षस्थानी आहेत.

**पिफ**

२३व्या पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाची काल एका सांगता झाली. या महोत्सवात जागतिक चित्रपट स्पर्धेमध्ये हाल्फदान उलमन तोंडेल यांनी दिग्दर्शित केलेल्या नॉर्वेच्या 'आरमंड' या चित्रपटाला उत्कृष्ट चित्रपटाचं महाराष्ट्र शासनाचं 'प्रभात' पारितोषिक मिळालं; तर संत तुकाराम उत्कृष्ट आंतरराष्ट्रीय मराठी चित्रपटाचं पारितोषिक रावबा गजमल यांनी दिग्दर्शित केलेल्या 'सांगळा' या चित्रपटाला मिळालं. मराठी चित्रपट महामंडळाचा सर्वोत्कृष्ट चित्रपट दिग्दर्शकाचा पुरस्कार 'स्नो फ्लॉवर' या चित्रपटासाठी गजेंद्र अहिरे यांना, सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा पुरस्कार अनिल दाभाडे यांना, सर्वोत्कृष्ट अभिनेत्री पुरस्कार छाया कदम यांना जाहीर करण्यात आला.

**अमितशहा**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा उद्या पुणे दौऱ्यावर येणार आहेत. त्यांच्या उपस्थितीत पश्चिम क्षेत्रीय परिषदेची 27वी बैठक होणार असून, दुपारी ते जनता सहकारी बँकेच्या अमृत महोत्सवी वर्षाच्या सांगता समारंभाला उपस्थित राहणार आहेत. संध्याकाळी, बालेवाडी येथील श्री शिव छत्रपती क्रीडा संकुलात शहा यांच्या उपस्थितीत, प्रधानमंत्री ग्रामीण आवास योजनेच्या दुसऱ्या टप्प्यातील दहा लाख लाभार्थ्यांना या योजनेतील पहिल्या हप्त्याचं वितरण तसंच 20 लाख लाभार्थ्यांना मंजूरी पत्रांचं वितरण करण्यात येणार आहे.

**दिल्ली-मुख्यमंत्री शपथ विधी**

प्रथमच आमदार झालेल्या रेखा गुप्ता यांनी काल दिल्लीच्या मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. दिल्लीच्या मुख्यमंत्रीपदी विराजमान होणाऱ्या रेखा गुप्ता या चौथ्या महिला आहेत.

**गोयल-ऑरिक**

जगात विविध देशांदरम्यान सुरू असलेल्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर शाश्वत विकासाची उद्दिष्ट गाठणं आव्हानात्मक बनलं असल्याचं प्रतिपादन केंद्रीय मंत्री पियूष गोयल यांनी काल पुण्यात केलं. परराष्ट्र मंत्रालय आणि पुणे इंटरनॅशनल सेंटर यांनी संयुक्तपणे आयोजित केलेल्या सहाव्या एशिया इकॉनॉमिक डायलॉग या वार्षिक परिषदेच्या उद्घाटन समारंभात ते बोलत होते. जोपर्यंत देशात वीज, पाणी आणि रस्ते यासारख्या पायाभूत सुविधा उपलब्ध करून दिल्या जात नाहीत, तो पर्यंत विकासाची कल्पना करता येत नाही. गेल्या 11 वर्षात या पायाभूत सुविधांच्या बाबतीत सरकारने भरीव कामगिरी केल्याचं गोयल यांनी नमूद केलं.

आगामी काळात छत्रपती संभाजी नगर मधील ऑरिक सीटीला देशातील प्रमुख औद्योगिक केंद्र म्हणून विकसित केलं जाईल; त्यामुळे येत्या काळात मराठवाडा औद्योगिक विकासाचं प्रमुख केंद्र बनेल असा विश्वास केंद्रीय मंत्री पीयूष गोयल यांनी काल छत्रपती संभाजी नगर इथे पत्रकार परिषदेत व्यक्त केला. यावेळी बोलताना गोयल म्हणाले..

**दहावीपरीक्षा**

राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात येणाऱ्या इयत्ता दहावीच्या लेखी परीक्षेला आजपासून सुरुवात होत आहे. यंदा राज्यातल्या ५ हजार १३० मुख्य केंद्रावर परीक्षा होत असून १६ लाख ११ हजार ६१० विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. गेल्या वर्षीप्रमाणे याही वर्षी निर्धारित वेळेनंतर 10 मिनिटे वेळ वाढवून देण्यात येणार असल्याचं मंडळानं कळवलं आहे.

**<u>कृषीमंत्री</u>**

बनावट कागदपत्रांच्या आधारे मुख्यमंत्री कोट्यातली सदनिका घेतल्याप्रकरणी राज्याचे कृषिमंत्री आणि सिन्नरचे आमदार माणिकराव कोकाटे आणि त्यांचे बंधू शिवाजी कोकाटे यांना नाशिकमधल्या न्यायालयानं २ वर्षांचा कारावास आणि ५० हजार रुपयांचा दंड ठोठावला आहे. याप्रकरणी न्यायालयांना दोघांनाही जामीन मंजूर केला आहे.

**<u>क्रिकेट</u>**

चॅम्पियन्स करंडक क्रिकेट स्पर्धेत काल भारतानं बांगलादेशवर 6 गडी राखून  मात करत या स्पर्धेत विजयी सलामी दिली. बांगलादेशच्या संघानं प्रथम फलंदाजी करत भारतापुढे २२९  धावांचं आव्हान ठेवलं; त्याला प्रत्युत्तर देताना ४७व्या षटकातच भारतीय संघानं विजय साकार केला. शुभमन गिलनं शतकी खेळी केली. त्याला सामनावीर पुरस्कारानं  सन्मानित करण्यात आलं.

**<u>हवामान</u>**

राज्यात सर्वत्र आज हवामान कोरडं राहण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.